20/07/2019

# प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेकनॉलॉजी अँड रिसर्च बडनेरा येथे आर्डिनो वर कार्यशाळा संपन्न

## इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांचा उपक्रम

अमरावती दि. १९ : स्थानिक प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेकनॉलॉजि अँड रिसर्च बडनेरा येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलेकॉम्म्युनिकेशन विभागातील फायनल इयर च्या विद्यार्थ्यांनी आपल्याच विभागातील द्वितीय वर्षाला शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आर्डिनो वर कार्यशाळा आयोजित केली होती. या दोन दिवसीय कार्यशाळेमध्ये विद्यात्यांनी विद्यात्यांना आर्डिनो चे प्रशिक्षण देऊन एक नवे उदाहरण समाजापुढे स्थापित केले. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना आर्डिनो ची संपूर्ण माहिती देऊन प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी स्वतः आपले एक मॉडेल आर्डिनो चा वापर करून तयार केल्याने त्यांच्या आत्मविश्वासात भर पडली.

इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलेकॉम्म्युनिकेशन विभागातील विद्यात्यांनी एम्बइडेड एक्सप्लोरर या एका टेकनिकल ग्रुप ची स्थापना मागील वर्ष्यात केली होती. ज्याचे उदघाटन डी. टी. ई. (विभागीय कार्यालय , अमरावती) चे डायरेक्टर डॉ. डी. व्ही. जाधव व डॉ. एम. एस. अली सहाय्यक संचालक ,डी. टी. ई. (विभागीय कार्यालय , अमरावती) यांच्या हस्ते करण्यात आले होते. समाजामध्ये टेकनिकल माहिती ची जागरूकता वाढवणे हा या क्लब चा प्रमुख उद्देश असून याचाच एक भाग म्हणून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उदघाटन विभाग प्रमुख डॉ. एस. एम. देशमुख यांनी केले. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच विभागाचे धोरण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच या कार्यशाळांमुळे संपूर्ण अमरावती रिजन मधून सगळ्यात जास्त प्लेसमेंट देणारे इलेकट्रोनिकस अँड टेलेकॉम्म्युनिकेशन इंजिनीरिंग हे एकमेव विभाग असल्याची माहिती त्यांनी दिली. विद्यात्यांच्या विकासाकरिता अश्या अनेक कार्यशाळा भविष्यातही आयोजित करण्यात येतील याची विभाग प्रमुख डॉ. एस. एम. देशमुख यांनी ग्वाही दिली.

या कार्यशाळेमध्ये एकूण १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सौरभ दुधे , प्रबोध येंडे व श्रेयश रायचंद या विद्यात्यांनी प्रशिक्षण दिले. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलेकॉम्म्युनिकेशन विभागातील डी. एस. पी. लॅब मध्ये हि कार्यशाळा संपन्न झाली. अश्याच कार्यशाळेमुळे आमचा विकास होऊन आत्मविश्वास उंचावतो असे विद्यात्यांचे मत आहे. कार्यशाळेसाठी संपूर्ण मदत केल्याबद्दल विद्यात्यांनी विदर्भ युथ वेलफेयर सोसायटी च्या कार्यकारणीचे , महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे , विभाग प्रमुखांचे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त केले.